RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक ५९(८)] बुधवार, ऑगस्ट ५, २०१५/श्रावण १४, शके १९३७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १२५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**विधि व न्याय विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ३१ जुलै २०१५

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक इएसटी. २०१३/प्र.क्र.५२६/का.-दोन.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या, विधि व न्याय विभागातील सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार आणि सचिव (विधि विधान) या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, ते असे :—

१. या नियमांस, विधि व न्याय विभागातील, सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार; सचिव (विधि विधान) (सेवाप्रवेश) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) ‘जिल्हा न्यायाधीश’ याचा अर्थ, जिल्हा न्यायाधीशाचे पद धारण करणारे न्यायिक अधिकारी, किंवा मुंबई उच्च न्यायालयाकडून नियमितपणे जिल्हा न्यायाधीश संवर्गात आणण्यात आलेले न्यायिक अधिकारी, असा आहे.

(ब) ‘शासन’ याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

(क) ‘विधि व न्याय विभाग’ याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा विधि व न्याय विभाग असा आहे ;

(ड) ‘सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार’ याचा अर्थ, विधि व न्याय विभागातील सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार, असा आहे ;

(इ) ‘सचिव (विधि विधान)’ याचा अर्थ, विधि व न्याय विभागातील सचिव (विधि विधान), असा आहे ;

३. सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल,—

(अ) ' प्रधान जिल्हा न्यायाधीश ' हे पद धारण करणाऱ्या व्यक्तीमधून योग्य व्यक्तीच्या बदलीने प्रतिनियुक्तीवर ;

**किंवा**

(ब) विधि व न्याय विभागातील विधि सल्लागार-नि-सह सचिव हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन निव्वळ गुणवत्ता या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ;

परंतु असे की ;

प्रधान जिल्हा न्यायाधीश हे पद धारण करणारी व्यक्ती बदलीने प्रतिनियुक्तीसाठी उपलब्ध होऊ न शकल्यासच, हे पद पदोन्नतीने भरण्यात येईल.

४. सचिव (विधि विधान) या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(अ) विधि व न्याय विभागातील प्रारुपकार-नि-सह-सचिव हे पद धारण करणाऱ्या आणि या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन निव्वळ गुणवत्ता या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ;

**किंवा**

(ब) प्रारुपकार-नि सह सचिव या मिम्न संवर्गातून पदोन्नतीसाठी योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास, जिल्हा न्यायाधीश हे पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीच्या बदलीने प्रतिनियुक्तीवर.

परंतु असे की,

पदोन्नतीसाठी योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंतच्या कालावधीसाठी बदलीने प्रतिनियुक्ती करण्यात येईल.

५. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, या बाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, त्याला/तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एम. ए. सईद,**
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी.

5. A person appointed to the post mentioned in rules 3 and 4 shall be required to pass examinations in Marathi and Hindi languages and according to the rules made in that behalf, unless he/she has already passed, or has been exempted from passing, those examinations.

6. A person appointed to the post mentioned in rules 3 and 4 should possess a Certificate in Computer Operation as prescribed by the Directorate of Information and Technology, Government of Maharashtra, from time to time.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. A. SAYEED,
Principal Secretary and Remembrancer of
Legal Affairs to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31st July 2015

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. EST.2013/CR.-526/D-2.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of the Secretary and Senior Legal Advisor, Secretary (Legislation) in the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Secretary and Senior Legal Advisor, and Secretary (Legislation) in the Law and Judiciary Department (Recruitment) Rules, 2015.

2. On these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " District Judge " means a Judicial Officer who is holding the post of District Judge or who has been brought from the cadre of the District Judge regularly by the High Court of Judicature at Bombay ;

(*b*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*c*) " Law and Judiciary Department " means the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra ;

(*d*) " Secretary and Senior Legal Advisor " means the Secretary and Senior Legal Advisor in the Law and Judiciary Department ;

(*e*) " Secretary (Legislation) " means the Secretary (Legislation) in the Law and Judiciary Department.

3. Appointment to the post of Secretary and Senior Legal Advisor shall be made either,—

(*a*) by transfer on deputation of a suitable person from amongst the persons holding the post of Principal District Judge ;

*Or*

(*b*) by promotion of a suitable person on the basis of strict selection with due regard to seniority, from amongst the persons holding the post of Legal Advisor-*cum*-Joint Secretary in the Law and Judiciary Department, having completed not less than three years regular service in that post :

Provided that, the post shall be filled up by promotion, only if a suitable person holding the post of Principal District Judge is not available for transfer on deputation on this post.

4. Appointment to the post of Secretary (Legislation) shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of strict selection with due regard to seniority, from amongst the persons holding the post of Draftsman-*cum*-Joint Secretary in the Law and Judiciary Department, having completed not less than three years regular service in that post ;

*Or*

(*b*) If eligible and suitable candidate for promotion from amongst the cadre of Draftsman-*cum*-Joint Secretary is not available then, by transfer on deputation of a suitable person from amongst the persons holding the post of Principal District Judge :

Provided that, transfer on deputation shall be made till the period, eligible and suitable candidate for promotion becomes available.